# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-४४१/२०२२ दिनांक :- ०५/०३/२०२२.

### HDFC Credit Card कार्डावरुन फसवणुक झालेली ७९,०३९/- रुपयाची रक्कम तक्रारदाराला परत - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी

दिनांक ०२/०३/२०२२ रोजी सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार नामे सचिन मधुकर दळवी, पत्ता - सी ३११, आकांक्षा को.सोसा, ठाकुर मार्ग, भाईंदर प. यांचेकडून तक्रारी अर्ज प्राप्त झालेला होता. तक्रारदार यांना दिनांक ०१/०३/२०२२ यांचे एचडीएफसी बँकेचे क्रेडिट कार्ड प्राप्त झाले. सदर क्रेडिट कार्ड ॲक्टीवेट करण्याकरीता तक्रारदार यांनी **गुगलवर** (Google Seach) **एचडीएफसी कस्टमर केअर चा क्रमांक घेवुन त्यावर कॉल केला.** कस्टमर केअरमधील अनोळखी इसमाने सांगितल्याप्रमाणे तक्रारदार यांनी कारवाई केल्यानंतर Anydesk App डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांचे क्रेडिट कार्डातुन **एकुण रुपये** ७९,०३९/- कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला. त्यावेळी तक्रारदार यांची बनावट कस्टमर केअर कडुन फसवणूक झाल्याची निदर्शनास आलेने त्यांनी तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिला.

सदरची तक्रार प्राप्त होताच सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ कारवाई करीत क्रेडिट कार्डच्या ट्रान्झॅक्शनचे अवलोकन केले असता सदरची रक्कम ही फ्लिपकार्टला गेल्याचे दिसुन आल्याने सायबर गुन्हे कक्ष यांचे निर्देशावरुन फ्लिपकार्ट कंपनीने तक्रारदार यांची फसवणुकीबाबतचे ट्रान्झॅक्शन तात्काळ रद्द करुन फसवणुक झालेली **एकुण ७९,०३९/-** रु रक्कम तक्रारदार यांचे क्रेडिट कार्डावर परत जमा केलेली आहे.

सायबर गुन्हे कक्ष यांचेकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, इंटरनेटचा (Google Seach) वापर करतांना सतर्क राहून फक्त संबंधित बँक/कंपनी यांची वेबसाईट शोधावी व अधिकृत वेबसाईट मधील क्रमांकावरच संपर्क साधावा. (Google Seach) मध्ये दिसून येणारे कस्टमर केअर क्रमांक हे बोगस असण्याची शक्यता आहे, त्यामुळे फसवणूक होवू शकते. तसेच अनधिकृत व्यवहाराबाबतची माहिती तात्काळ संबंधित बँक/क्रेडीट कार्ड यांना कळवावी.

सदरची कामगिरी मा.श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजितकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, मपोशि/सुवर्णा माळी, सायबर क्राईम सेल, मपोशि/ माधुरी धिंडे, सायबर क्राईम सेल यांनी केली असुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम ७९,०३९/- रु पुर्ण रक्कम त्यांना परत करण्यात आली आहे.

----